मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘स्मार्ट कार्ड’वरच 'मेट्रो' अन् ‘पीएमपी'

## पहिल्या टप्प्यात पुणे मेट्रो आणि पीएमपी बस यासाठी एकच कार्ड वापरता येणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीत सार्वजनिक वाहतुकीतून प्रवास करणाऱ्यांना ‘मेट्रो’, ‘पीएमपी’ यासाठी एकाच कार्डवर प्रवास करता येणार आहे. पुणे मेट्रो टप्पा-१, हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो आणि पीएमपी बस या तिन्ही ठिकाणी प्रवाशांना एकाच कार्डावर प्रवास करता यावी, यासाठी तीनही प्रशासनाकडून ‘स्मार्ट कार्ड’चे काम सुरू आहे. याचा फायदा प्रवाशांना होणार आहे. पहिल्या टप्प्यात पुणे मेट्रो आणि पीएमपी बस यासाठी एकच कार्ड वापरता येणार आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ‘पीएमआरडीए’च्या हद्दीत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) सार्वजनिक प्रवासी सेवा देण्यात येते. तसेच पुणे आणि पिपंरी-चिंचवड शहरात ‘महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन’कडून (महामेट्रो) प्रवासी सेवा सुरू आहे. सध्या प्रवाशांना मेट्रोतून प्रवास करताना आणि ‘पीएमपी’तून प्रवास करताना वेगवेगळे तिकीट काढावे लागते. त्यासाठी वेगवेगळ्या ॲपचा वापर करावा लागतो. तर हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सेवा मार्च २०२६ पर्यंत सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांना त्या मार्गावर प्रवास करताना वेगळे तिकीट काढून प्रवास करावा लागू शकतो. त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाया जातो. प्रवाशांच्या सोयीसाठी तिनही ठिकाणी एकाच कार्डवर प्रवास करता यावा, यासाठी प्रशासनाकडून



‘वन पुणे कार्डा’वरच त्यांची सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पुढील काही महिन्यांत ही सेवा प्रवाशांना मिळणार आहे.

### ‘पेमेंट गेट’वे अडचण दूर करणार

महामेट्रो आणि पीएमपी या दोन्ही यंत्रणांकडून ऑनलाइन तिकिटाचे पैसे घेण्यासाठी वेगवेगळ्या बँकांचा वापर केला जातो. त्यामुळे ‘पेमेंट गेट वे’ वेगवेगळे असल्यामुळे ही अडचण दूर करण्यासाठी सध्या प्रयत्न सुरू आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पुणेरी मेट्रोसोबत याबाबत बैठक झाली असून, ‘वन पुणे कार्ड’बाबत त्यांच्यासोबत चर्चा झाली आहे. त्यामुळे महामेट्रो व पुणेरी मेट्रोचा प्रवास सुरुवातीपासूनच एकाच कार्डवरून करता यावा, याद्दष्टीने सुविधा निर्माण केली जाणार आहे.

### ‘पीएमपी’च्या ॲपवर मेट्रोचे तिकीट

» पीएमपी व महामेट्रो यांच्याकडून एकत्रित तिकीट प्रणाली विकसित केली जात आहे. ‘आपली पीएमपीएमएल ॲप’वरून मेट्रोचे तिकीट काढण्यासाठी प्रणालीचे इंटिग्रेशन केले जात आहे. त्यासाठी ‘ॲप्लिकेशन प्रोग्रॅमिंग’चे आदानप्रदान केले जाणार आहे. त्यानंतर दोन्ही तिकिटे जोडली जातील. एकाच कार्डवरून तिकीट निघावे, यासाठीही काम सुरू आहे, अशी माहिती ‘पीएमपी’ने दिली आहे.

“ ‘महामेट्रो’कडून पीएमपी, पुणेरी मेट्रो यांच्यासोबत एकाच कार्डावरून प्रवासाची सोय व्हावी; म्हणून त्यावर काम सुरू केले आहे. पुणेरी मेट्रो, ‘पीएमपी’सोबत चर्चा करून त्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्याचे काम सुरू आहे. नवीन मेट्रो मार्ग सुरू होईपर्यंत येत्या वर्षात पुणेकरांना एकाच कार्डवरून प्रवास करता येईल, यासाठी आम्ही काम करत आहोत.

**- चंद्रशेखर तांबवेकर, अतिरिक्त महासंचालक (जनसंपर्क), महामेट्रो**

---

# दिशाच्या दिवाळी फराळात रंगली राजकारणाच्या पलीकडची गप्पांची मैफल..!

## मतभेद विसरून उत्सवी वातावरणात हरवले चेहरे; मान्यवरांनी अनुभवली खरी आत्मीयतेची दिवाळी

**पिंपरी | प्रतिनीधी**

दिवाळीचा उत्साह, फराळाचा सुगंध, आनंदाचे सूर...अशा आनंदमय आणि उत्सवी वातावरणात दिशा सोशल फाऊंडेशनच्या ‘दिवाळी फराळ’ने रविवारी (१९ ऑक्टोबर) आनंदाची पर्वणीच दिली. राजकीय आखाड्यातील प्रतिस्पर्धी नेते, प्रशासकीय अधिकारी यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर एकाच छताखाली जमले. हास्यकल्लोळ, गतस्मृतींना उजाळा आणि धमाल किश्श्यांमुळे जवळपास चार तास गप्पांची ही मैफल रंगली.

दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने पिंपरीतील ‘ श्री कृष्ण पॅलेस’मधील ‘सुदामा हॉल’मध्ये या दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, माजी आमदार विलास लांडे, ॲड. गौतम चाबुकस्वार, माजी महापौर संजोग वाघेरे, राहुल जाधव, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, तुषार कामठे, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, माजी शहराध्यक्ष वसंत लोंढे, भाऊसाहेब भोईर, राहुल कलाटे, सदाशिव खाडे, अजित गव्हाणे, सचिन साठे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, स्थायी समितीचे माजी सभापती जगदीश शेट्टी, प्रशांत शितोळे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, निलेश शिंदे, सलीम शिकलगार.



माजी विभागीय आयुक्त दिलीप बंड, पिंपरी पालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, पुणे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी डॉ भाऊसाहेब कारेकर, निवृत्त उपजिल्हाधिकारी अशोक मुंढे, स्वामी रामानंद विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर, प्राचार्य नितीन घोरपडे, लेखक सौरभ कर्डे, श्रीकांत चौगुले. अर्जून पुरस्कार विजेते शांताराम जाधव, श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, हिंद केसरी अमोल बुचडे, भारत केसरी विजय गावडे, पिंपरी-चिंचवड इंजिनिअरिंग कॉलेजचे संचालक गिरीश देसाई, माजी नगरसेवक सुरेश भोईर, धनंजय काळभोर, उल्हास शेट्टी, प्रसाद शेट्टी, बाळासाहेब मोरे, संतोष कांबळे, अमित गावडे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, अमित बाबर, पीसीएमटीचे माजी सभापती सुरेश चिंचवडे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती माणिकराव अहिरराव, नाट्यनिर्माते राहुल भंडारे, कार्यकारी निर्माता रत्नकांत जगताप, अभिनेते नितीन धुंदुके, महेश मोहगावकर, ‘कलोपासक’चे प्रदीप पाटसकर, ‘चंद्ररंग’चे संचालक विजय जगताप, ‘यशदा’ ग्रूपचे संचालक वसंत काटे, प्रेरणा बँकेचे अध्यक्ष कांतीलाल गुजर, इंद्रायणी बँकेचे संस्थापक ॲड. एस. बी. चांडक, भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब विनोदे आदीची प्रामुख्याने उपस्थिती होती.

### दिशा सन्मान सत्कार सोहळा

» खासदार श्रीरंग बारणे व माजी विभागीय आयुक्त दिलीप बंड यांच्या हस्ते दिशा सन्मान देऊन गाडगीळ यांना गौरवण्यात आले.

» त्याचप्रमाणे, ‘नाळ २’ या मराठी चित्रपटातील लक्षवेधी भूमिकेसाठी पदार्पणातच राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला बालकलाकार भार्गव रत्नकांत जगताप याचा सत्कार विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला.

» पिंपरी पालिकेच्या आयटीआयचे सेवानिवृत्त अधिकारी मनोज ढेरंगे यांचा सत्कार माजी खासदार अमर साबळे व आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

» सेवानिवृत्त सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील पवार यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते पवारांचा सत्कार करण्यात आला.

» वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेले ज्येष्ठ पत्रकार माधव सहस्त्रबुद्धे यांचा सत्कार माजी आमदार विलास लांडे व माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांच्या हस्ते करण्यात आला.

# दिवाळीत प्लास्टिकचा वापर टाळा..

## दिवाळी सणांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाचे नागरिकांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या उत्साहात बाजारपेठा, घरांची सजावट आणि भेटवस्तूंची खरेदी यांना वेग आला आहे. मात्र, या आनंदात प्लास्टिकच्या वापरामुळे निर्माण होणारा पर्यावरणीय आणि आरोग्याचा धोका लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने नागरिकांना जबाबदारीने सण साजरा करण्याचे आवाहन केले आहे.




आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचनेनुसार दिवाळीच्या काळात बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, कप, प्लेट्स, फुगे, सजावटीच्या वस्तू आणि गिफ्ट रॅप्स यांचा वापर वाढतो. या सर्व वस्तू वापरल्यानंतर थेट कचऱ्यात जातात व पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात हानी पोहोचवतात. अशा वस्तू विघटन न होणाऱ्या असल्याने नाल्यांमध्ये अडथळे निर्माण होतात, प्रदूषण वाढते आणि सार्वजनिक आरोग्यावर विपरित परिणाम होतो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'पर्यावरणपूरक दिवाळी, स्वच्छ शहराची दिवाळी' हा संदेश देत विविध जनजागृती उपक्रम राबवत आहे.

याशिवाय, प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष तपासणी पथकेही तयार करण्यात आली आहेत. प्लास्टिक पिशव्यांचा वापर करताना अथवा विक्री करताना निदर्शनास आल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

> " घरातील स्वच्छतेबरोबरच पर्यावरणाची स्वच्छता राखणे हीसुद्धा आपली जबाबदारी आहे. प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक कापडी, कागदी किंवा पुनर्वापर करता येणाऱ्या पर्यायांचा वापर करून सण साजरा करावा. प्लास्टिकमुक्त दिवाळी ही फक्त मोहीम नसून प्रत्येक नागरिकांनी देखील हा संकल्प पाळायला हवा.
>
> – विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.


> " नागरिकांनी दिवाळीच्या खरेदीवेळी कापडी पिशव्यांचा अधिकाधिक वापर करावा त्याचबरोबर नैसर्गिक व पुनर्वापरयोग्य सजावट करावी तसेच, प्लास्टिक वस्तूंच्या ऐवजी मातीच्या किंवा धातूच्या दिव्यांना प्राधान्य देऊन पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी.
>
> – सचिन पवार, उप आयुक्त आरोग्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# संरक्षण विभागाच्या जमिनीमुळे रिंग रोड प्रकल्पाला अडथळा

## सोलू–वडगाव दरम्यान संरक्षण विभागाची जमीन ताब्यात न आल्याने पहिल्या टप्प्याची निविदा रखडली

**पुणे | प्रतिनीधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वर्तुळाकार रस्ता (रिंग रोड) प्रकल्पाला अडथळा आला आहे. सोलू ते वडगाव दरम्यान संरक्षण विभागाची जागा ताब्यात आली नसल्याने पहिल्या टप्प्यातील कामाची निविदा रखडली असल्याचे स्पष्ट झाले आहे.




पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात अवजड वाहनांमुळे होणारी वाहतूककोंडी सोडविण्यासाठी पीएमआरडीकडून पुणे जिल्हा प्रादेशिक योजनेंतर्गत सन १९९७ मध्ये हा रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. १२८ किलोमीटर लांब आणि ११० मीटर रुंदीचा प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला. त्यानुसार 'पीएमआरडीए'ने १४५.७५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूदही केली. त्यानुसार सोलू ते निरगुडे आणि निरगुडे ते वडगाव शिंदे असे दोन भाग करण्यात आले आहेत. मात्र, नागरिकांचा विरोध झाल्याने त्याच रस्त्याची रुंदी ६५ मीटर निश्चित करण्यात आली.

या रस्त्याला राज्य सरकारकडून मंजुरी देण्यात आली. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सोलू ते वडगाव शिंदे या ४.७ किमी लांबीच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू होणार आहे. त्यामुळे नगर रस्त्यावरील वाहतूककोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. पीएमआरडीएने संबंधित प्रकल्पातील भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला. ही वन विभागाची जागा असून, याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

दरम्यान, या वर्तुळाकार रस्ता प्रकल्पातील सुमारे ८३ किलोमीटर काम पीएमआरडीए, ४० किलोमीटरचे काम एमएसआरडीसी, तर ५.७० किलोमीटरचे काम महापालिकेने करण्याचे नियोजन आहे. मावळ तालुक्यातील परंदवडी ते खेड तालुक्यातील सोलू असा ४० किलोमीटरचा हा रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) विकसित करणार आहे.

### जागा कोणाच्या?

- सरकारी जागा २३.२८ हेक्टर,
- खासगी २९३.८४ हेक्टर,
- वन जमीन ४५.८४ हेक्टर
- संरक्षण खाते ६.२५ हेक्टर
- नगररचना योजनेच्या माध्यमातून ३८.८४ हेक्टर
- एमआयडीसीची ५.२८ हेक्टर

### वर्तुळाकार रस्त्याची वैशिष्ट्ये

- १२८ किलोमीटर लांब, ६५ मीटर रुंद
- ४४ गावांवरून रस्ता जाणार
- खेडमधील एक, हवेलीतील २७, मुळशी येथील दहा आणि मावळमधील सहा गावांचा समावेश
- प्रकल्पासाठी ७४३.४१ हेक्टर जागा आवश्यक

> " वर्तुळाकार रस्त्याच्या पहिल्या टप्प्यात (सोलू ते वडगाव शिंदे) २३ हेक्टर जागा वन आणि संरक्षण विभागाची आहे. त्यापैकी वन विभागाची जागा मिळण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे. मात्र, संरक्षण विभागाच्या जागेचा ताबा मिळालेला नाही. त्यामुळे या टप्प्यातील निविदा प्रक्रिया थांबली आहे.
>
> – डॉ. योगेश म्हसे, महानगर आयुक्त, पीएमआरडीए

# राजू शेट्टींचे गंभीर आरोप, मंत्री मुरलीधर मोहोळ यांचं स्पष्टीकरण

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंग हाऊस जमीन व्यवहार प्रकरणात गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊस जमीनीच्या व्यवहार प्रकरणात माजी आमदार रवींद्र धंगेकर आणि शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी भारतीय जनता पार्टीचे खासदार तथा मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप केले होते. यामुळे पुण्यात चांगलंच राजकारण तापल्याचं पाहायला मिळालं. मात्र, या आरोपांवर आता केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माध्यमांशी संवाद साधत स्पष्टीकरण दिलं आहे. तसेच या व्यवहारात माझा काहीही संबंध नसल्याचं सांगत सर्व आरोप मोहोळ यांनी फेटाळून लावले आहेत.

राजू शेट्टी आणि पुण्यातील नेत्याने आरोप केले म्हणून मी हे स्पष्टीकरण देत नाही, तर ज्या पुणेकरांनी मला निवडून दिलं, ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला की आमच्या खासदाराने चांगलं काम केलं पाहिजे, लोकांची भावना विश्वासात घेऊन काम केलं पाहिजे. पण मागच्या पाच ते सहा दिवसांत नक्कीच माझ्या पुणेकरांच्या मनात कुठेतरी शंका आली असेल की या प्रकरणात तथ्य काय आहे? यामध्ये सत्य काय आहे? म्हणून त्यांच्यासाठी आज मी स्पष्टीकरण देत आहे", असं मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे.






### जैन बांधवांशी संवाद

» मोहोळ यांनी पुढे म्हटले की, जैन बांधवांशी त्यांचा संवाद सुरू असून, त्यांना मदत करायची असल्यास ते तत्पर आहेत. मी पुणेकरांचा लोकप्रतिनिधी आहे, कोणत्या भागीदारीत राहता येईल किंवा नाही, याचे नियम मी पाळतो. या प्रकरणात कोणताही गैरसमज न राहावा, म्हणून स्पष्ट करतो, असे त्यांनी नमूद केले. अखेर, केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी ही प्रकरणाची माहिती सर्व संबंधितांना देण्याची तयारी असल्याचे सांगितले आणि कोणताही प्रश्न असल्यास योग्य तपासणी करण्यासाठी खुली भूमिका ठेवली.

"जैन बोर्डिंग हाऊस जमीन व्यवहार प्रकरणाचं जे खरेदी खत झालं, हा व्यवहार करताना पुण्यातील गोखले बिल्डर्सने ते विकत घेतलं. मात्र, माझ्यावर असा आरोप झाला की, गोखले बिल्डर्सचा मी भागीदार आहे. मी माझ्या लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्रात घोषित केलं की, मी शेती व्यवसाय करतो, मी दोन ठिकाणी कंस्ट्रक्शनचा व्यवसाय करतो. गेले १५ ते २० वर्षांत मी वेगवेगळ्या ठिकाणी बांधकाम व्यवसाय करतो. एका राजकारणी माणसाने व्यवसाय करू नये का? स्वच्छ व्यवसाय केला. मला काहीही लपवण्याची गरज नाही", असं मोहोळ म्हणाले.

"गोखले यांच्याबरोबर मी प्रतिज्ञापत्रामध्ये सादर केलेल्या माहिती प्रमाणे दोन एलएलपी संस्था होत्या, या दोन भागीदारी संस्था आहेत, त्यातील एक संस्था २०२२ मध्ये आणि दुसरी २०२३ मध्ये तयार झाली होती. मी या एलएलपी संस्थांमधून बाहेर पडायच्या आधी देखील एकही रुपयांचा व्यवहार या दोन्ही संस्थांमधून झालेला नाही. हे सर्वजण तपासू शकता. आता जैन बोर्डिंग हाऊसच्या विषयाबाबत सांगतो की या दोन्ही एलएलपीचा मी राजीनामा देऊन २५ नोव्हेंबर २०२४ मध्ये बाहेर पडलो होतो. त्याचे हे माझ्याकडे कागदपत्रे आहेत", असं मोहोळ यांनी म्हटलं आहे.

### सर्व सार्वजनिक दस्तऐवजांवर

» त्यांनी सांगितले की, त्यांनी सर्व आर्थिक व्यवहार निवडणूक प्रतिज्ञापत्रात घोषित केले आहेत आणि हे सर्व सार्वजनिक दस्तऐवजांवर आधारित आहे. मी शेती व्यवसाय आणि बांधकाम व्यवसाय करत आहे, पण राजकारण्यांनी व्यवसाय केले तरी तो पूर्णपणे स्वच्छ आहे, असेही त्यांनी नमूद केले. मंत्री मोहोळ यांनी राजू शेट्टी यांच्यावर टोकाचे आरोप करताना संवाद न साधल्याबाबतही दुःख व्यक्त केले. जर त्यांनी प्रत्यक्ष भेटून किंवा कॉल करून विचारले असते, तर मी सत्य परिस्थिती स्पष्ट केली असती. चुकीच्या आरोपांमुळे एखाद्याचे राजकीय करियर प्रभावित होऊ शकते, असंही मोहोळ यांनी सांगितलं.

"जैन बोर्डिंगच्या ट्रस्ट्रींनी १६ डिसेंबर २०२४ मध्ये ही जमीन विकसकाला देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर अनेक वर्तमान पत्रात या संदर्भातील त्यांनी टेंडर नोटीस देखील दिली होती. त्यानंतर ही सर्व प्रक्रिया झाल्यानंतर गोखलेंनी ही जमीन ८ ऑक्टोबर २०२५ मध्ये घेतली, म्हणजे तुम्ही पाहिलं तर हा व्यवहार कधी झाला ८ ऑक्टोबर २०२५ मध्ये आणि मी बाहेर कधी पडलो २०२४ मध्ये. मग माझा या विषयांशी संबंध कुठे आला?", असं स्पष्टीकरण मोहोळ यांनी दिलं आहे.

# महापालिका निवडणुकीसाठीची अंतिम मतदारयादी होणार जाहीर

## निवडणुकीची अंतिम मतदारयादी महापालिका प्रशासनाला 28 नोव्हेंबरला प्रसिद्ध करावी लागणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने पुण्यासह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मतदारयादीत नव्याने कोणाचेही नाव समाविष्ट होणार नसले, तरी दुबार नावे,मृत मतदारांची नोंद वगळण्याबरोबरच यादीतील चुका टाळण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत. निवडणुकीची अंतिम मतदारयादी महापालिका प्रशासनाला २८ नोव्हेंबरला प्रसिद्ध करावी लागणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक साडेतीन-चार वर्षांपासून रखडलेली आहे. महापालिकेच्या सभागृहाची मुदत संपल्याने संपूर्ण कारभार लोकप्रतिनिधींऐवजी प्रशासनाच्या हाती आला आहे. निवडणूक घेण्याची मागणी केली जात होती; तरी निर्णय होत नव्हता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक तातडीने घेण्याचा आदेश दिल्याने ही रखडलेली निवडणूक घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने वेगाने सुरू केली आहे.



आयोगाने केलेल्या सूचनांनुसार, महापालिका आयुक्तांनी आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी स्थानिक वृत्तपत्र, महापालिका व प्रभाग समिती कार्यालयांचे सूचनाफलक, महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करायची आहे. तसेच, जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या मतदारयादीचा वापर न करता निवडणूक आयोगाने दिलेली मतदारयादी वापरावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. महापालिका निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची विधानसभानिहाय मतदारयादी ग्राह्य धरली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.या मतदारयादीमध्ये नव्याने नावे नोंदली जाणार नाहीत. केवळ तांत्रिक चुका दुरुस्त करून ती अंतिम केली जाणार आहे. आयोगाने मतदारयादी महापालिका प्रशासनाला पाठविली आहे. तिचे प्रभागनिहाय विभाजन करून प्रारूप मतदारयादी तयार केली जाणार आहे.

### नावे नसल्यास हरकत नोंदविता येणार

» महापालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निवडणूक आयोगाची यादी प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर नागरिकांना हरकती नोंदविता येणार आहेत. या हरकतींनुसार केवळ लेखनिकांच्या चुका, दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून वेगळ्या प्रभागात गेले असतील, विधानसभा मतदारसंघाच्या यादीत नावे असूनही महापालिकेच्या संबंधित प्रभागाच्या यादीतून नावे गायब झाली असल्यास ती प्रभागाच्या यादीत समाविष्ट करता येणार आहेत.

# एकीकडे रोहित्र चोरांचा धुमाकूळ, दुसरीकडे बिबट्याची दहशत

## सहा महिन्यांत 48 रोहित्र चोरीला, खेड तालुक्यावर दुहेरी संकट

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या रोहित्र चोरीच्या मालिकेमुळे नागरिकांची यंदाची दिवाळी अंधारात साजरी होण्याची शक्यता आहे. तब्बल ४८ पेक्षा जास्त रोहित्रांची चोरी झाल्याची माहिती समोर आली असून, पोलिसांत गुन्हे दाखल होऊनही तपास मात्र शून्य अवस्थेत आहे. रोहित्र चोरीमुळे अनेक गावांतील पाणीपुरवठा योजनांवर परिणाम झाला असून, ऐन सणासुदीत वाड्या-वस्त्यांवर अंधार पसरला आहे.

या चोऱ्यांमुळे शेतकऱ्यांच्या हातपंपाच्या मोटारी बंद पडल्या असून, पिकांना पाणी देण्याचे नियोजन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. रोहित्र नसल्याने पसरलेल्या अंधारामुळे रात्रीच्या वेळी बिबट्याच्या वावराची दहशत अधिक वाढली आहे. शेतकऱ्यांसाठी रात्री पिकांना पाणी द्यायला जाणे म्हणजे जीव मुठीत धरून जाण्यासारखे झाले आहे. महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, इतक्या मोठ्या संख्येने नवीन रोहित्र शासनाकडून मिळवणे अवघड ठरत असल्याने वीजपुरवठा सुरू करण्यास विलंब होत आहे.

"सहा महिन्यांपासून चोरी सुरू आहे, पण एकाही प्रकरणाचा तपास लागलेला नाही. चोर मोकाट आणि आम्ही अंधारात आहोत," असे संतप्त नागरिकांनी सांगितले. पोलिसांनी विशेष तपास पथक नेमून या चोरींना आळा घालावा आणि महावितरणने तातडीने नवीन रोहित्र पुरवावे, जेणेकरून सणाच्या काळात तरी नागरिकांना उजेड मिळेल, अशी मागणी नागरिक करत आहेत.

रवींद्र गायकवाड यांनी सांगितले की, सहा महिन्यात ४८ रोहित्र चोरी झाल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात नवीन रोहित्र उपलब्ध होत नाहीत. वीज नसल्याने अनेक गावांमध्ये ऐन दिवाळीत अंधार पसरला आहे आणि दुसरीकडे बिबट्याची दहशत वाढली आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी त्वरित चोरट्यांना जेरबंद करावे, अन्यथा भविष्यात अनेक गावांमध्ये अंधार पसरेल.



### चोर मोकाट, आम्ही अंधारात..

» नागरिकांमध्ये प्रशासन आणि पोलीस यंत्रणेविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. "सहा महिन्यांपासून चोरी सुरू आहे, पण एकाही प्रकरणाचा तपास लागलेला नाही. चोर मोकाट आणि आम्ही अंधारात आहोत," असे संतप्त नागरिकांनी सांगितले. पोलिसांनी विशेष तपास पथक नेमून या चोरींना आळा घालावा आणि महावितरणने तातडीने नवीन रोहित्र पुरवावे, जेणेकरून सणाच्या काळात तरी नागरिकांना उजेड मिळेल, अशी मागणी नागरिक करत आहेत.

### महावितरणचे लाखोंचे नुकसान..

» खेड तालुक्यात एप्रिल २०२५ पासून आजपर्यंत ४८ रोहित्रांची चोरी झाली आहे. १०० केव्ही रोहित्राची किंमत तीन ते साडेतीन लाख, तर २०० केव्ही रोहित्राची किंमत साडेचार ते पाच लाख रुपये असते. १०० केव्ही रोहित्रात ७० ते ८० किलो तांब्याची तार आणि २३० लिटर ऑईल असते. २०० केव्ही रोहित्रामध्ये १२० ते १३० किलो कॉपर असते. झटपट पैसे मिळवण्यासाठी चोरट्यांनी वीज रोहित्र लक्ष्य केले असून, यामुळे महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

### बिबट्याची दहशत वाढली..

» जिल्हा विद्युत नियंत्रण समितीचे सदस्य रवींद्र गायकवाड यांनी सांगितले की, सहा महिन्यात ४८ रोहित्र चोरी झाल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात नवीन रोहित्र उपलब्ध होत नाहीत. वीज नसल्याने अनेक गावांमध्ये ऐन दिवाळीत अंधार पसरला आहे आणि दुसरीकडे बिबट्याची दहशत वाढली आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी त्वरित चोरट्यांना जेरबंद करावे, अन्यथा भविष्यात अनेक गावांमध्ये अंधार पसरेल.

# राष्ट्रवादीत येणाऱ्यांना सन्मानाची वागणूक देऊ : उपमुख्यमंत्री अजित पवार

## दौंड शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या जाहीर प्रवेश सोहळा व संवाद मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

सरकार येत असते जात असते, सगळेच जण त्याच ठिकाणी राहतात असे नाही. जसे चार दिवस सासूचे असतात तसेच चार दिवस सुनेचे सुद्धा येतात. त्यामुळे आपण कधीही सत्ता असली म्हणून मस्ती दाखवू नये. सत्ता नसली तरी ना उमेद होऊ नये. नव्याने पक्षात आलेल्या सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेस मान सन्मानाची वागणूक देणार आहे. आगीतून उठलो आणि फुफाट्यात पडलो, अशी वेळ माझ्यासहित कोणीही तुमच्यावर येऊ देणार नाही, हा शब्द मी देतो, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

दौंड शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या जाहीर प्रवेश सोहळा व संवाद मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, माजी आमदार रमेश थोरात, माजी जिल्हा परिषद सदस्य वीरधवल जगदाळे, गुरुमुख नारंग, महेश भागवत, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी दौंड भाजपचे माजी शहराध्यक्ष स्वप्निल शहा, माजी नगरसेवक नंदू पवार, मनोज फडतरे व इतर पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

पवार म्हणाले की, दौंड एक महत्त्वाचे जंक्शन आहे. नवीन पिढी व्यापारात आली आहे. रेल्वेचे चांगले साधन आहे. त्यामुळे सर्वांचा विचार केला तर शहरामध्ये बऱ्याच गोष्टी करण्यासारख्या आहेत. काही लोकांकडून म्हटले जाते की, बारामतीचा विकास व इतर शहर भकास. असे बिलकुल नाही. मी सर्वांना मदत करतो. शहराला झालेल्या मदतीमधील पैशाचा योग्यरित्या खर्च झाला पाहिजे तरच शहराचा विकास होतो. दौंड तालुक्यातील अनेक रस्त्यांना मी निधी दिलेला आहे. पीएमआरडीए खात्याचा निधी सुद्धा दौंड तालुक्याला आला आहे. अष्टविनायक गणपतीसाठी दीडशे कोटी रुपये आपण खर्च करीत आहोत. योग्य कामाला योग्य ठिकाणी पैसे देण्याची आमची तयारी असते.




### विरोधकांनाही चिमटा

» पवार यांनी दौंड शहर आणि तालुक्यात जाणीवपूर्वक गुन्हे दाखल करण्याचा उल्लेख यावेळी केला. हा धागा पकडत त्यांनी सत्तेत असलेल्या आणि सध्या तालुक्यात विरोधक असलेल्या नेत्यावर अप्रत्यक्ष टोला लगावला. पोलीस प्रशासनाविषयी बोलताना पवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा, घटनेचा आदर करून पोलिसांनी काम करावे. निरपराध लोकांना त्रास देऊ नये, फार काळ ते सहन केले जात नाही, हे पोलीस प्रशासनाने ध्यानात घ्यावे.